# <u>रे.दि.मु.नं.४/२०१५ मधील</u>
# <u>नि.१६ खालील आदेश</u>

*(गणपतराव नावडकर विरुध्द विठ्ठल महाडिक वगैरे ८)*

(१). वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ९ विरुध्द तुर्तातुर्त मनाई करीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ७ व ९ यांचे म्हणणे व कैफियत नि.२४ वाचले. प्रतिवादी क्र.८ यांना मनाई अर्जाची नोटीस लागुन देखील ते हजर झाले नाहीत व त्यांनी म्हणणे दिलेले नाही. सबब नि.१६ कडील मनाई अर्ज त्यांचे म्हणण्याशिवाय चालवण्यात आला.

(२). वादीतर्फे श्री.आर.जे.लाड वकील व प्रतिवादी क्र.१ ते ७ व ९ तर्फे श्री.एम.एम.मुळे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या अर्जातील कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १. वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का? | .... <u>नाही</u> |
| २. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर झाल्यास, वादीचे कशानेही न भरुन येणार असे नुकसान होईल, असे वादीने शाबीत केले आहे का ? | .... <u>नाही</u> |
| ३. न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | .... <u>नाही</u> |
| ४. काय आदेश ? | <u>अर्ज नामंजुर करण्यात येतो</u> |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत–

(३). मौजे कुंडल येथील गट नं.२४५९ मधील दक्षिणेकडील ३६ आर क्षेत्रामध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करुन बांधकाम केले असुन सदर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी व अतिक्रमीत क्षेत्रामध्ये बांधलेली घरे काढुन मिळणेसाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सदर ३६ आर क्षेत्रास **दावा मिळकत** असे संबोधीत केलेले आहे. वादीने दावा मिळकतीची शासकीय मोजणी केली होती. प्रतिवादींनी शासकीय मोजणीदारांनी दावा मिळकतीच्या केलेल्या हद्दीच्या खुणा मोडुन काढल्या व दावा मिळकतीमध्ये पुर्वी असलेल्या घराशेजारी जनावराचे पक्के शेड, शौचालय व स्नानगृह बांधुन वादीच्या दावा मिळकतीतील कब्जास हरकत अडथळा करु नये अशी मनाई देणेबाबत विनंती केली आहे.

(४). प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ ते ७ व ९ यांनी नि.२४ येथे कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे दिलेले आहे. त्यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण केलेले नाही. दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येते. प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार हे १०० वर्षांपासुन कुंडल गावी शेतजमिनीत राहतात. सर्व्हे नंबर २२५ ही शेतजमीन सन १९३८ साली बक्षिसपत्राने पांडुरंग महाडिक, रामचंद्र महाडिक, बाळकृष्ण महाडिक यांच्या नांवे समाईक हिश्याने नोंद झाली. त्यामध्ये त्यांचे सोईनुसार वहिवाट होती तिच वहिवाट त्यांच्या वारसांच्या दरम्यान सुरु आहे. कुंडल गावचे विभाजन झाल्यानंतर सर्व्हे नंबर २२५ चे गट नं.२४५८ ते २४६७ असे गट नंबर पडले. त्यामध्ये पांडुरंग महाडिक, रामचंद्र महाडिक व बाळकृष्ण महाडिक यांची व त्यांच्या वारसांची सोईनुसार वहिवाट आहे. त्यामध्ये प्रत्येक खातेदाराची राहण्याची पक्की घरे आहेत. गट नं.२४५८ मध्ये विठ्ठल महाडीक नारायण महाडिक, जयवंत महाडिक, बाळासो महाडिक यांची पक्की घरे आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी त्यामध्ये पक्का गोठा व बाथरुम बांधलेले आहे. त्यांनी दाव्यातील सर्व कथने नाकारुन वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

(५). वादी याने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१, २, ४ ते ६ यांनी दावा मिळकतीमध्ये दक्षिण–पुर्व कोप–यात घरे बांधल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे सदर घराजवळ प्रतिवादी क्र.१, २, ४ ते ६ यांनी दावा मिळकतीमध्ये ३६ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचे नमुद केले आहे. दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशामध्येदेखील गट नं.२४५८ मधील धारकांचे कब्जात गट नं.२४५९ मधील ३६ आर क्षेत्र कब्जात असल्याचे नमुद केले आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कब्जा अतिक्रमणाने असल्याचे वादीने दाव्यात कथन केले आहे. यावरुन दावा मिळकतीमध्ये वादीऐवजी प्रतिवादी यांचा कब्जा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

(६). प्रतिवादी क्र.१ ते ७ व ९ यांनी गट नं. २४५८ मध्ये विठ्ठल महाडिक, बाळासो महाडिक व जयवंत महाडिक यांच्या नावची घरे आहेत हे दर्शवण्यासाठी ग्रामपंचायत कुंडल कडील कर आकारणी तक्ते अनुक्रमे नि.४१ ते नि.४३ येथे हजर केले आहेत. यावरुनदेखील त्यांची घरे गट नं.२४५८ मध्ये असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. दाव्यातील कथनानुसार व प्रतिवादींनी नि.२७ च्या यादीसोबत अ.क्र.२० व २१ कडे दाखल केलेल्या अनुक्रमे सर्व्हे नंबर टिक्का नं.१ वरुन सर्व्हे नं.२२५ च्या नकाशाची नक्कल व टिक्का नं.३ वरुन गट नकाशाची नक्कल यांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा मिळकत व प्रतिवादींची मिळकत अनुक्रमे गट नं.२४५९ व गट नं.२४५८ एकमेकास लागुन आहेत.

(७). प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे बांधकाम करत असल्याचे दर्शवण्यासाठी व त्यांनी बेकायदेशीरपणे हद्दीचे पोल काढुन टाकले हे दर्शवण्यासाठी वादीने नि.१८ च्या यादीसोबत अ.क्र.१ व २ कडे रंगीत छायाचित्रे हजर केली आहेत. केवळ सदर रंगीत छायाचित्रांवरुन सदरचे बांधकाम हे प्रतिवादींचे असल्याचे व त्यांनी दावा मिळकतीमधील पोल काढुन टाकले असे म्हणणे न्यायाचे होणार नाही. वादीने मुळ दावा अतिक्रमणाचा केला आहे. वादीच्याच कथनानुसार प्रतिवादींनी

दावा मिळकतीमध्ये ३६ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले असे नमुद करुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी व अतिक्रमीत क्षेत्रामध्ये प्रतिवादींनी बांधलेली घरे पाडुन खुला कब्जा मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे मुळ दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी व मॅँडेटरी ताकिदीसाठी असल्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा आहे असे कथन करुन वादीने प्रस्तुत कामी दिलेला तुर्तातुर्त मनाईचा अर्ज व मुळ दाव्यामधील कथने ही एकमेकास विसंगत असल्याचे दिसुन येते.

(८). वादीने दाव्यामध्येच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींची घरे आहेत व प्रतिवादी ऊस पिक घेत असल्याचे नमुद केले आहे. प्रस्तुत कामी वादीचा दावा व प्रतिवादींची कैफियत याचा साकल्याने विचार करता दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले किंवा कसे हे चौकशीअंती शाबीत होणार आहे. वर नमुद केल्याप्रमाणे वादीने प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केल्याचे कथन करुन अतिक्रमीत मिळकतीच्या कब्जासाठी सदरचा दावा दाखल केला आहे. यावरुन दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कब्जा नसल्याचे दिसुन येते. याउलट दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी घरे बांधली असल्याचे वादीने नमुद केले आहे. दावा मिळकतीमध्ये असलेली प्रतिवादी यांची घरे त्यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधली किंवा कसे ही बाब संपुर्ण काम गुणदोषावर चालुन निर्णीत झाल्याशिवाय अभिलेखावर येणार नाही. सद्यस्थितीला वादीच्या हक्कात मनाईचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचे अपरिमीत नुकसान होईल. याउलट मनाईचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येईल असे नुकसान होईल हे दाखवणेसाठी वादीने कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्याचप्रमाणे दाव्याचे समतोलत्वदेखील प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या बाजुने आहे. सबब मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# **आदेश**

(१) वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

(२) खर्चाबाबत आदेश नाही.

सही/xx

पलुस. (एस.एस.पाटील)

दिनांक–३०.०७.२०१५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलुस.